**परिवहन सेवा,**

**ठाणे महानगरपालिका,ठाणे**

प्रशासकिय भवन,मार्ग क्र.२७ व ३४,

वागळे आगार,वागळे इस्टेट,

ठाणे ४०० ६०४

# निविदा दस्तऐवज

(मुल्य रुपये १०,०००/- +विक्रीकर)

परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका उपक्रमाच्या बस ताफयात JNNURM अंतर्गत येणा-या २०० बसेसवर भाडे तत्वावर जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी हक्क देणेबाबतची निविदा.

**THANE MUNICIPAL TRANSPORT UNDERTAKING**
Administrative Building
Road No. 27 & 34, Wagle Depot, Wagle Estate,
Thane (West) - 400 604
**परिवहन सेवा,ठाणे महानगरपालिका**
प्रशासकिय भवन,मार्ग क्र.२७ व ३४,वागळे आगार,
वागळे इस्टेट,ठाणे (प.) पीन कोड - ४०० ६०४

**दुरध्वनी क्रमांक**
२५८१२७५३
२५८१२७५४
**फॅक्स क्रमांक**
२५८३७९३९

ठामपापसे/पव्य/निविदासुचना/ ५४८ /२००९ दिनांकः-२४ /१२/२००९

प्रति,
---------------------------
---------------------------
---------------------------
---------------------------

परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका उपक्रमाच्या बस ताफयात JNNURM अंतर्गत येणा-या २०० बसेसवर वार्षिक भाडे तत्वावर जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी एकमेव हक्क निविदाकारास देण्याबाबत निविदेच्या सर्वसामान्य अटी व निविदाकारास सूचना.

## १) <u>निविदेच्या कक्षा/विस्तार/मर्यादा</u>

१.१ यापुढे निविदेचा अर्थ परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका उपक्रमाच्या बस ताफयात JNNURM अंतर्गत येणा-या २०० बसेसवर भाडे तत्वावर तीन वर्षाच्या कालावधीसाठी जाहिरात प्रदर्शित करण्याचे खालील अटी व शर्तीवर दिलेले पूर्ण हक्क असा होय.

१.२ कराराचा कालावधी निविदा मंजुर झाल्यापासुन तीन वर्षाचा राहील.

## २) <u>निविदाकाराचे कार्यालय</u>

यशस्वी निविदाकाराचे कार्यालय हे ठाणे , मुंबई व नवी मुंबई परिसरात असावयास हवे व तेथुन त्यांनी कराराच्या संबंधात कार्यवाही करावी. कराराच्या कालावधीमध्ये कराराबाबत काही वाद विवाद निर्माण झाल्यास करावयाच्या दाव्या बाबातचे न्यायालयीन कामकाज हे ठाणे न्यायाधिकरणाच्या कक्षेत राहील याची नोंद घ्यावी.

## ३)	**<u>भाडे देकार   नमुद करण्याबाबत</u>**

३.१	निविदाकाराने प्रत्येक  वर्षाचे दर स्वंतत्रपणे नमुद करणे आवश्यक आहे.

३.२  परिवहन सेवेच्या बस ताफयात  JNNURM अंतर्गत येणा-या २०० बसेसवर जाहिरात प्रदर्शित करण्यास  एकुण किती जागा उपलब्ध आहेत  त्याचा सर्वसाधारण तपशिल सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद केलेला आहे.

३.३	जाहिरात भाडयाचे दर सोबत जोडलेल्या तक्ता  "क" नमुन्यामध्येच नमुद   केल्यानुसार देण्यात यावेत. अन्यथा सदर निविदा बाद ठरविण्यात येईल.

३.४	नमुद करण्यात आलेला देकार  हा आकडयामध्ये व अक्षरी  स्पष्ट   हस्ताक्षरात लिहिलेला असावा.

३.५	नमुद करण्यात आलेल्या  देकाराच्या  आकडयामधील रकमेत व अक्षरी रकमेत तफावत असल्यास अक्षरामधील दर हे अधिकृत गृहीत धरले जातील.

३.६	निविदेमध्ये करण्यात येणा-या दुरुस्त्यांचे ठिकाणी निविदाकाराने नांवाची अद्याक्षरे लिहुन  सही करावी.

३.७	निविदे सोबत जोडण्यात येणा-या कागदपत्रावर पृष्ठाकंन क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.

३.८	मुळ निविदा साक्षांकीत करुन लिफाफा क्रमांक १ सोबत जोडावयाची आहे. तत्पुर्वी निविदेची एक छायाप्रत निविदाकाराने स्वखर्चाने स्वतःसाठी काढुन घ्यावयाची आहे.

३.९	परिवहन सेवेच्या बसताफयामध्ये JNNURM अंतर्गत २०० बसेस दाखल होणार आहेत. २०० बसेसपैकी १६० बस हया फ्रंट इंजिनच्या व ४० बस हया रिअर इंजिनच्या असणार आहेत.

३.१० निविदाकारास परिवहन सेवेच्या बस ताफयात JNNURM अंतर्गत येणा-या २०० बसेसचे जाहिरात भाडे व प्रादेशिक परिवहन कार्यालयाची जाहिरात फी(कर)अदा करावी लागेल.त्यातील काही बस दररोज आर.टी.ओ.पासींग,प्रिव्हेन्टीव्ह मेन्टेनंस,मेजर दुरुस्ती व अन्य कामासाठी राखीव  ठेवल्या जातील याची नोंद निविदाकाराने देकार देतांना घ्यावयाची आहे.

३.११ बस जाहिरातीसाठी मार्गावर उपलब्ध करुन दिल्या नाहीत या सबबी खाली निविदाकारास आगाऊ भरणा केलेल्या जाहिरात भाडयाचा परतावा केला जाणार नाही याची नोंद निविदाकाराने घ्यावयाची आहे.

३.१२ JNNURM अंतर्गत खरेदी करण्यात येणा-या बस ताफयात रेअर इंजिनच्या ४० बस आहेत सदर बसचे इंजिन हे पाठीमागील भागात आहे.

३.१३ JNNURM अंतर्गत खरेदी करण्यात येणा-या बसवर JNNURM चे बोधचिन्ह येणार आहे. JNNURM चे बोधचिन्ह असलेली जागा जाहिरातीसाठी उपलब्ध होणार नाही याची नोंद निविदाकाराने घ्यावयाची आहे.

३.१४ निविदेचे एकुण दर्शनी मुल्य तीन वर्षाकरीता खालील तक्त्याप्रमाणे किमान रक्कम रुपये २,८८,००,०००/- (रुपये दोन कोटी अठ्ठयायशी लक्ष मात्र) इतके राहिल.

| वर्ष. | बस संख्या. | प्रति बस प्रति महा जाहिरात दर रक्कम रुपये. | एकुण रक्कम रुपये. |
|---|---|---|---|
| पहिले. | २०० | ३,५००/- | ८४,००,००० |
| दुसरे. | २०० | ४,०००/- | ९६,००,००० |
| तिसरे. | २०० | ४,५००/- | १,०८,००,००० |
| एकुण रक्कम रुपये - | | | २,८८,००,००० |

## **४. निविदेसोबत द्यावयाची माहिती.**

### **४.१ लखोटा क्रमांक १ – तांत्रिक बाबींचा लखोटा**

१. इतरत्र करीत असलेल्या जाहिरात प्रदर्शित करण्याबाबतच्या यापूर्वीच्या लगतच्या ३(तीन) वर्षाच्या अनुभवाच्या दाखल्यासह तपशील.

२. निविदाकार इतर उद्योगधंदा करीत असल्यास त्याबाबतचा पूर्ण तपशील.

३. भागीदारी संस्था असल्यास भागीदारांचे नांव,पत्ता व करारप्रत व संस्था नोंदणी पत्राची प्रत.

४. निविदाकाराची लगतच्या ३(तीन) वर्षाची प्रत्येक वर्षाची वार्षिक उलाढाल रक्कम रुपये २ कोटी (रुपये दोन कोटी मात्र) असल्याबाबत लगतच्या मागील ३ वर्षाचा सनदी लेखाकाराने प्रमाणित केलेला वार्षिक ताळेबंद व नफा तोटा पत्रक.

५. मागील तीन वर्षाचा इन्कमटॅक्स क्लिअरन्सचा दाखला.

६. निविदाकार यांस अधिक माहिती/स्पष्टीकरण करावयाचे असल्यास ते स्वतंत्र पत्रात टंकलिखित करुन आपल्या सहीनिशी जोडावे.सदर पत्रासोबत कागदपत्रे जोडल्यास त्यावर निविदाकाराने पूर्ण सही करुन जोडावीत.

७. या व्यतिरिक्त जाहिरात प्रदर्शित करण्यापोटी आवश्यक असलेले सरकारी सेवाकर भरणा करण्यासाठी सेवाकर नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

८. निविदा प्रपत्रातील परिशिष्ट "ब" संपूर्ण भरलेले, सोबत जोडावे.

९. लखोटा क्र.१ मध्ये निविदाकाराने कुठल्याही प्रकारची देकाराची रक्कम नमुद करु नये. रक्कम नमुद करणारी कागदपत्रे आढळल्यास निविदा बाद करण्यात येईल.

१०. लखोटा क्र.१ वर निविदाकाराने परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका उपक्रमाच्या बस ताफयात JNNURM अंतर्गत येणा-या २०० बसेसवर तीन वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर जाहिरात प्रदर्शित करण्याचे हक्क देणेबाबत निविदेसोबत जोडावयाची कागदपत्रे असे स्पष्ट नमुद करावे.

११. साक्षांकीत केलेले मुळ निविदा प्रपत्र.

१२. वरीलप्रमाणे नमुद केलेली कागदपत्रे लखोटा क्र.१ मध्ये आढळुन न आल्यास लखोटा क्र.२ उघडला जाणार नाही.

१३. लखोटा क्रमांक १ (तांत्रिक बाबींचा लखोटा) यावर निविदाकाराने कामाचे नांव, स्वतःचा पत्ता, निविदा क्रमांक इसारा रक्कम पावती क्र. व दिनांक नमुद करुन लखोटा स्वतंत्रपणे सिलबंद करावा.

### ४.२ <u>लखोटा क्र.२ (देकाराच्या रकमेचा लखोटा.)</u>

१. जाहिरात भाडयाचे दर निविदाकाराने परिशिष्ट "क" मध्ये भरुन त्यावर रबरी सिल व शिक्यासह स्वाक्षरी करावी.

२. लखोटा क्रमांक २ वर निविदाकाराने परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका उपक्रमाच्या बस ताफयात JNNURM अंतर्गत येणा-या २०० बसेसवर तीन वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर जाहिरात प्रदर्शित करण्याचे भाडयापोटी द्यावयाचा रकमेचा तक्ता असे स्पष्ट नमुद करावे.

३. लखोटा क्रमांक २ (देकाराच्या रकमेचा लखोटा) यावर निविदाकाराने कामाचे नांव, स्वतःचा पत्ता, निविदा क्रमांक इसारा रक्कम पावती क्र. व दिनांक नमुद करुन लखोटा स्वतंत्रपणे सिलबंद करावा.

## **<u>४.३ लखोटा क्र.३</u>**

तिस-या क्रमांकाचे मोहोरबंद लखोटयावर खालील तपशील नमुद करावा.

४.१ निविदा क्रमांक

४.२ निविदा उघडण्यात येणारी दिनांक

४.३ परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका उपक्रमाच्या बस ताफयात JNNURM अंतर्गत येणा-या २०० बसेसवर तीन वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर जाहिरात प्रदर्शित करण्याचे खालील अटी व शर्तीवर दिलेले पूर्ण हक्क देण्याची निविदा.

४.४ निविदाकाराच्या कार्यालयाचा पत्ता.

४.५ लखोटा क्रमांक १(तांत्रिक बाबींचा लखोटा) व लखोटा क्रमांक २ (भाडे दराचा लखोटा) दोन्ही लखोटे स्वतंत्रपणे सिलबंद करुन तिस-या मोठया लखोटयामध्ये सिलबंद करुन सादर करावे.

## ५) **<u>निविदाकाराची सही.</u>**

निविदाकाराने प्रत्येक जोडलेल्या तक्त्यावर आपली स्वतःची स्वाक्षरी करावी.तसेच त्यात नमुद करणेत आलेल्या ठिकाणी साक्षीदारांच्या स्वाक्ष-या घ्याव्यात.

## ६) **<u>कराराचा कालावधी व सुरुवात</u>**

६.१ जाहिरात प्रदर्शित करण्याच्या कराराची सुरुवात सक्षम प्राधिका-यांची मंजुरी मिळाल्यानंतर होईल आणि कालावधी तीन वर्षाचा राहील.

६.२ बसेसवर जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी यशस्वी निविदाकार कराराचे मुदतीनंतर सदर मुदत पुढील एक वर्षाकरीता वाढवुन घेऊ इच्छित असतील तर त्यांनी रितसर अर्ज परिवहन व्यवस्थापकांस तीन महिने आधी सादर करावयांस हवा.पण सदर मुदत वाढविण्याचे किंवा नाकारण्याचे पुर्ण अधिकार मा.परिवहन समितीच्या मंजुरीने परिवहन व्यवस्थपक परिवहन सेवा,ठाणे महानगरपालिका यांचे अखत्यारीत राहतील.परिवहन व्यवस्थापकांनी वरील प्रमाणे कराराचे वरील अटीनुसार नुतनीकरण केल्यास करारांचे नियम/अटी/हक्क हे यापूर्वी केलेल्या कराराप्रमाणे तसेच नवीन घातलेल्या अटीसह कंत्राटदारास बंधनकारक राहतील.

## ७) <u>इसा–याची रक्कम</u>

७.१ निविदाकाराने निविदेसोबत इसा-याची रक्कम रुपये ५,००,०००/-( अक्षरी रुपये पाच लक्ष मात्र) रोखीने अथवा सार्वजनीक क्षेत्रातील बँकेच्या स्थानिक शाखेवरील धनाकर्षाद्वारे या कार्यालयाकडील लेखा विभागात मोहोरबंद निविदा सादर करण्याच्या दिनांक व वेळेपर्यंत जमा करुन पावती प्राप्त करुन घ्यावी.

७.२ निविदाकाराने पैसे भरणा केल्याबाबतचा तपशील, पावती क्रमांक, तारीख इत्यादी सोबतच्या "ब" परिशिष्टातील योग्य त्या स्तंभात नमुद करावी व त्याची पावती (झेरॉक्स प्रत) परिशिष्ट 'ब' सोबत लखोटा क्र.१ मध्ये जोडावी.

७.३. निविदेसोबत इसा-याची रक्कम न भरल्यास अशा निविदेचा विचार केला जाणार नाही.

७.४. इसा-याच्या रकमेवर व्याज दिले जाणार नाही.

७.५ निविदाकार निश्चित झाल्यानंतर अयशस्वी निविदाकाराची इसा-याची रक्कम मुळ पावती व मागणी पत्र सादर केल्यावर परत करणेत येईल.

७.६ यशस्वी निविदाकाराकडुन वेळेत काम न झाल्यास इसा-याची रक्कम जप्त करण्यात येईल.

७.७ यशस्वी निविदाकाराने माघार घेतल्यास इसा-याची रक्कम दंड म्हणुन जप्त करण्यात येईल.

## ८) निविदा स्विकारणेबाबत.

८.१ निविदा स्विकारणेचे अधिकार परिवहन व्यवस्थापकांना विहित असतील.त्यासाठी अधिकतम अथवा अन्य निविदा स्विकारणे तसेच बदल, फेरबदल,चर्चा करणे, वाटाघाटी करणे अथवा नाकारणे इत्यादी अधिकार हे त्यांचेसाठी राखुन ठेवण्यात आले आहेत. त्यासाठी कोणतीही कारणे देण्यास ते बांधील राहणार नाहीत.

८.२ निविदेची मान्यता करारनाम्याच्या सोबत जोडलेल्या अटीनुसार नियमित केली जाईल.

## ९) निविदा सादर करण्याची अंतीम तारीख

९.१ निविदा मोहरबंद लखोटयातुन स्वहस्ते वरील कार्यालयात सदर निविदेसाठी राखुन ठेवलेल्या सिलबंद पेटीत दिनांक २२/०१/२०१० रोजी दुपारी १५.०० वा.पर्यंत टाकण्यात याव्यात.

९.२ उपरोक्त तारीख वेळेच्या नंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

## १०) निविदा उघडण्याबाबत.

१०.१ शक्य झाल्यास प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २५/०१/२०१०रोजी दुपारी १६.०० वाजता परिवहन व्यवस्थापक यांचे कार्यालयात इच्छुक निविदाकाराच्या अथवा त्यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत उघडण्यात येतील. अन्यथा निविदा उघडण्याची तारीख नोटीस बोर्डावर प्रदर्शित करण्यात येईल.

१०.२ उपरोक्त अटीचे पालन न करता सादर करण्यात आलेल्या निविदा बाद ठरविल्या जातील. एखाद्या निविदाकाराने एकापेक्षा अधिक निविदा दुस-या नावाने सादर केल्यास किंवा केल्याचे निदर्शनास आल्यास त्या निविदाकाराच्या सर्व निविदा बाद करण्यात येतील.

त्याचप्रमाणे करार रद्द केला जाईल आणि इसा-याची रक्कम किंवा सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाणार नाही.याबाबत मा.परिवहन व्यवस्थापक यांचा निर्णय अंतिम असून तो बंधनकारक राहील.

(सही)

परिवहन व्यवस्थापक.
परिवहन सेवा,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

## परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

## निविदेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती.

परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका उपक्रमाच्या बस ताफयात JNNURM अंतर्गत येणा-या २०० बसेसवर तीन वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर जाहिरात प्रदर्शित करण्याचे हक्काबाबत परिवहन सेवा,ठाणे महानगरपालिका व यशस्वी निविदाकार यांचेमधील कराराच्या निविदाकारास सर्वसाधारण अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.

**१) कराराची मुदत/ सुरुवात –**

१.१ जाहिरात प्रदर्शित करण्याचा करार परिवहन व्यवस्थापकांनी मंजुरी दिलेल्या कार्यादेशाच्या तारखेपासुन सुरु होईल.करारनाम्याची मुदत तीन वर्षासाठी राहिल.

१.२ जाहिरात प्रदर्शित करण्यासाठीचा करार १ ते १५ तारखेच्या आत (दोन्ही दिवस धरुन) निश्चित झाल्यास कराराची सुरुवात त्या महिन्याच्या १ तारखेपासुन होईल.

१.३ जाहिरात प्रदर्शित करण्यासाठीचा करार १५ ते त्या महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत सुरुवात केल्यास पुढील महिन्याचे १ तारखेपासुन कराराची सुरुवात करण्यात येईल.

**२) सुरक्षा अनामत .**

२.१ यशस्वी निविदाकारास करारनामा करण्यापूर्वी सुरक्षा अनामत पोटी एकुण देकाराच्या रकमेची राष्ट्रीसकृत बॅकेवी ठाणे/मुंबई शाखेतील ३.५ वर्षाकरीता वैध असलेली बॅक गॅरेटी दयावी लागेल.

२.२ निविदा स्विकृतीचे पत्र यशस्वी निविदाकारास दिल्या पासुन १५ दिवसाचे आंत सुरक्षा अनामत रक्कम परिवहन सेवेकडे जमा न केल्यास ठेका रद्द करण्यांत येईल व जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

२.३ कराराच्या कालावधीमध्ये यशस्वी निविदाकाराकडुन परिवहन सेवेस भाडयापोटी किंवा अन्य काही कारणास्तव रक्कम येणे बाकी असल्यास किंवा अन्य काही शासकीय संस्थाचे कर भरणा न केल्याचे निदर्शनांस आल्यास सदरची रक्कम यशस्वी निविदाकाराने परिवहन

सेवेकडे जमा केलेल्या सुरक्षा अनामत म्हणुन दिलेल्या बॅंक गॅरेटीच्या रकमेतुन वळती करण्यात येईल.

२.४ यशस्वी निविदाकारास विहित मुदतीत सर्व शासकीय कर,अन्य संस्थाचे कर/देणी भरणे निविदाकारावर बंधनकारक आहे. ते भरल्याची कागदपत्रे विहित मुदतीत निविदाकाराने परिवहन सेवेकडे सादर करावी. बॅंक गॅरेटी परत देतेवेळी शासकीय कर व इतर कर व देणी नसल्याची खात्री झाल्यावर निविदाकाराची बॅंक गॅरेटी परत केली जाईल.

२.५ कराराच्या कालावधीमध्ये निविदा अटी शर्तीचा किंवा करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनांस आल्यास सुरक्षा अनामत रकमेपोटी ठेवलेली बॅंक गॅरेटी वळती करण्यात येईल.

२.६ बॅंक गॅरेटी पडताळणीसाठी रक्कम रुपये २०००/-एवढी रक्कम भरणे आवश्यक आहे.

## ३) <u>कराराच्या अटी /कालावधी/जाहिरात भाडे /दर</u>

३.१ निविदाकाराने बसेसवर आक्षेपार्ह जाहिराती लावल्याचे आढळून आल्यास परिवहन व्यवस्थापक किंवा त्यांनी नेमून दिलेले अधिकारी यांचेकडून अशा जाहिराती उतरवण्याबाबत नोटीस प्राप्त झाल्यास त्या तीन तासाचे आत संबंधित बसेसवरुन स्वखर्चाने काढावयाच्या आहेत. अन्यथा परिवहन सेवा स्वतः अश्या जाहिराती काढुन टाकेल व त्याबाबत येणारा खर्च निविदाकाराकडून वसूल करेल.

३.२ निविदाकाराने देकारात तीन वर्ष कालावधीसाठी परिवहन सेवेस देऊ केलेल्या जाहिरात भाडयाच्या एकत्रित रक्कमेची सरासरी काढुन जी रक्कम येईल त्यानुसार प्रतिबस प्रति महिना भाडे आकारुन ६ महिन्याचे आगाऊ भाडे आकारण्यात येईल.

३.३ सहा महिने पोटीची होणारी जाहिरात भाडयाची रक्कम सुरुवातीस आगाऊ भरणा करावी लागेल.पुढील जाहिरात भाडयाची रक्कम जाहिरातीचा पुढील ६ महिन्याचा कालावधी सुरु होण्यापूर्वी किमान १ महिना आगाऊ परिवहन सेवेकडे भरणा करावी लागेल.

३.४ ज्या कालावधीपासुन जाहिरात भाडे देय असेल त्या कालावधीपुर्वीच्या तारखेचा धनादेश/ धनाकर्ष देणे निविदाकारावर देणे बंधनकारक राहिल. त्यानंतरच्या तारखेचा

धनादेश/धनाकर्ष दिल्यास ज्या कालावधी पासुन जाहिरात भाडे देय आहे त्यापासुन धनाकर्षाच्या तारखेपर्यंत १८%दराने व्याज देणे निविदाकारावर बंधनकारक राहिल.अन्यथा व्याजाची रक्कम निविदाकाराच्या सुरक्षा अनामत रकमेपोटी ठेवलेल्या बॅक गॅरेटीतुन वळती केली जाईल. त्यामुळे तेवढयाच रकमेची वाढीव बॅक गॅरेटी परिवहन सेवेकडे देणे निविदाकारावर बंधनकारक राहिल.

**४) जाहिरात प्रदर्शित करण्याच्या फळयांचा (बोर्डाचा) तपशील.**

४.१ या कराराप्रमाणे बसेसच्या बाहेरील पाठीमागील बाजुस जाहिरात प्रदर्शित करावयाचे बोर्ड हे १६ गेज डब्ल्यु.जी.लोखंडी धातुचे पत्र्याचे असावेत जो अडकविण्यासाठी दोन खाली व दोन वर भोके असावीत.

४.२ निविदाकाराने जाहिराती सुस्थितीत ठेवावयास हव्यात.याबाबतचे सर्व सामानसुमान इत्यादी निविदाकाराने स्वखर्चाने आणले पाहिजे. जाहिराती बाबतचे कोणतेही काम,रंगकाम पुसणे इत्यादी करताना परिवहन सेवेच्या परिसरातील भिंतीवर व इतर मालमत्तेची खराबी होणार नाही याची पूर्ण दक्षता घेतली पाहिजे,टापटीपपणा ठेवला पाहिजे. बसेसवरील जाहिरातीच्या निरोपयोगी काढलेल्या सर्व सामानाचा एक स्वतंत्र ठिकाणी ढिग लावुन त्याची आगाराबाहेर परिवहन सेवेच्या परवानगीने विल्हेवाट लावावी अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

४.३ जेंव्हा जाहिरात प्रदर्शित करण्याचा करार संपुष्टात येईल. त्यावेळी निविदाकाराने बसवरील सर्व जाहिराती पुसुन टाकावयास/काढुन टाकावयास हव्यात व उपक्रमाच्या रंगसंगतीप्रमाणे पुनश्चः रंगकाम करुन ठेवावयास हवे व त्याप्रमाणे उपक्रमाचे परिवहन व्यवस्थापक निर्देशित करतील त्या अधिका-यास दाखवावयास हवे. सदर काम योग्य प्रकारे न झाल्यास ते खात्यातर्फे करुन घेण्यात येईल व त्याबाबत येणारा खर्च देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. सदरचा खर्च न दिल्यास सुरक्षा अनामत रक्कम म्हणुन ठेवलेल्या बॅक गॅरेटीमधुन वसुल करण्यात येईल.

४.४ बसचे मागील बाजुस जाहिरात बसविण्याचा खर्च व दोन्ही बाजुस जाहिराती रंगविण्याचा खर्च हा निविदाकाराने स्वखर्चाने करावयाचा आहे.सदर जाहिराती बसवितांना परिवहन सेवेच्या बसेसची खराबी,नुकसान होणार नाही याची दक्षता निविदाकाराने घ्यावयाची असुन अशा प्रकारची कोणतीही खराबी झाल्यास त्याची नुकसान भरपाई निविदाकारास करावी लागेल.जाहिरातीचे बोर्ड हे योग्य त-हेने बसविण्याची जबाबदारी निविदाकाराची राहिल.

४.५ जाहिरातीचे बोर्ड काढण्याचे,रंगविण्याचे,बसविण्याचे ,लावण्याची इत्यादी कामे निविदाकाराने शक्यतो रात्रीच्यावेळी अथवा त्यांना सदर कामासाठी बसेस उपलब्ध करुन देण्यात येतील त्याच वेळात करावी लागतील.

४.६ परिवहन सेवेच्या बसवर ज्यावेळेत जाहिरात प्रदर्शित केलेली नसेल त्यावेळेस सदरची बस परिवहन सेवेच्या रंगसंगतीप्रमाणे रंगविणे निविदाकारावर बंधनकारक राहील.

४.७ कराराच्या कालावधीत जाहिराती मिळविणे वा त्यापोटी जाहिरात भाडे वसुल करणे याची सर्व जबाबदारी निविदाकाराची राहील त्यास परिवहन सेवा कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

**४-अ) नुकसान भरपाई बाबत.**

१) जाहिरात बसविणे/काढणे/रंगकाम करणे इत्यादी कामे करतांना निविदाकार किंवा त्यांचे नोकरवर्ग इत्यादी यांना परिवहन सेवेच्या आवारात कोणत्याही कारणान्वये दुखापत/नुकसान झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी ही संबंधित निविदाकाराची राहील. निविदाकाराने नियुक्त केलेंल्या कामगारांचा कराराच्या कालावधीसाठी विमा उतरवुन त्याची कागदपत्रे दरवर्षी परिवहन सेवेकडे सादर करणे बंधनकारक राहील. याबाबत परिवहन सेवा कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.तसेच परिवहन व्यवस्थापक/परिवहन सेवा उपक्रम सदर दुखापत झालेल्या इसमास/व्यक्तीस कोणत्याही कायद्याखाली नुकसान भरपाई देण्यांस बांधील राहणार नाही.

२) निविदाकाराने नेमलेले कामगार हे निविदाकाराचे कंत्राटी कामगार समजण्यात येऊन निविदाकाराने कामगार विषयक अधिनियमाच्या त्यास लागु असलेल्या तरतुदीचे पालन करुन त्यानुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील. त्याबाबत परिवहन उपक्रमाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

३) जाहिरात बसवितांना ,रंगकाम करतांना/काढतांना इत्यादी कामे निविदाकार किंवा त्यांचे कामगार यांचेकडुन परिवहन सेवेच्या मालमत्तेस तसेच परिवहन सेवेतील कोणत्याही कर्मचा-यास वा पादचा-यास किंवा प्रवाश्यास दुखापत झाल्यास त्याबाबत नुकसान भरपाई देण्याची संपुर्ण जबाबदारी ही संपूर्णतः निविदाकारावर राहील.

४) जाहिरात बसविणे/काढणे/पुसुन टाकणे/रंगकाम करणे इत्यादी कामासाठी विशेष करुन परिवहन सेवा उपक्रमाच्या आवारात नेमण्यात येणारी माणसे/कामगार यांची योग्य छाननी करुन परिवहन व्यवस्थापकाचे मान्यतेने नेमणुक करावी लागेल.

५) ठेका सुरु असतांना जाहिरातीचे अथवा जाहिरात बोर्डाची झीज,खराबी, नुकसानी, गहाळ होणे इत्यादीबाबत परिवहन सेवा जबाबदार राहणार नाही. तसेच याबाबत कोणतीही नुकसान भरपाई देण्यास परिवहन सेवा बांधील राहणार नाही.

६) परिवहन सेवेच्या बसेसची साफ-सफाई करतांना दुरुस्ती अथवा अपघातामुळे , रंगविलेल्या जाहिरातीचे नुकसान झाल्यास परिवहन सेवा जबाबदार राहणार नाही. तसेच त्याबाबत कोणतीही नुकसान भरपाई देण्यास बांधील राहणार नाही.

**<u>५) जाहिरातीच्या जागा मसुदा,डिझाईन,इत्यादीबाबत मंजुरी.</u>**

५.१ प्रदर्शित करावयाच्या जाहिराती,त्यांचे डिझाईन,मसुदा इत्यादीसाठी परिवहन व्यवस्थापक किंवा त्यांनी नेमून दिलेले अधिकारी यांची लेखी परवानगी/मंजूरी घेणे आवश्यक आहे.

**६) महानगरपालिका अथवा सरकारी कार्यालयाची परवानगी मिळविणेबाबत व <u>जाहिरात कर भरणे.</u>**

६. १ जाहिरात प्रदर्शित करणेबाबत जरुन ते परवानगी पत्र संबंधित ठाणे महानगरपालिका आणि आयुक्त/अधिक्षक/उपआयुक्त/आयुक्त केंद्रीय उत्पादन शुल्क यांचे संबंधित

कार्यालयाकडुन जाहिरात सेवाकर भरण्याबाबतचे नोंदणीपत्र त्यांचेकडुन घेणे व योग्य तो जाहिरात कर अथवा अन्य कर भरुन परवाना मिळविण्याची जबाबदारी निविदाकाराची असेल व तसे परवानगी पत्र निविदाकाराने दोन प्रतीत परिवहन व्यवस्थापक किंवा त्यांनी नेमलेले अधिकारी यांचेकडे कंत्राट सुरु होण्यापूर्वी सादर केले पाहिजे.

६.२ बसेसवर जाहिरात प्रदर्शित करण्याकरीता मोटार वाहन कायद्यातील नियमानुसार जाहिरात प्रदर्शित करणेपोटी अदा करावयाची रक्कम ही परिवहन सेवेकडे प्रति बस प्रति वर्ष रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र) प्रमाणे किंवा त्यावेळेस प्रचलित असलेल्या दरानुसार सर्व बसेसकरीता ठेकेदाराने परिवहन सेवेकडे आगाऊ भरणा करणे बंधनकारक राहील.

६.३ बसेसवर जाहिरात प्रदर्शित करणेबाबत आवश्यक मान्यता पत्र संबंधित महानगरपालिका आणि तत्सम सरकारी कार्यालय यांचेकडुन घेणे तसेच जाहिरात कर भरुन परवाना मिळविण्याची जबाबदारी निविदाकाराची असुन जाहिरात फी व कर अदा करणे हे निविदाकारावर बंधनकारक राहील.तसेच निविदाकाराने महानगरपालिकेस करारानुसार जाहिरात प्रदर्शित करण्यापोटी त्या त्या आर्थिक वर्षाची लायसन्स फी नियमानुसार अदा करुन त्या पावतीची प्रत परिवहन व्यवस्थापक यांचेकडे वेळोवेळी सादर करावयास हवी.

६.४ परिवहन उपक्रमाच्या बसेसवर कोणतीही जाहिरात प्रदर्शित केल्यानंतर त्याबाबतची कालावधीसह तपशिलवार माहिती संबंधित निविदाकाराने ठाणे महानगरपालिकेच्या जाहिरात विभागास वेळचेवेळी कळविली पाहिजे व त्यानुसार जाहिरात कर अदा करण्याची जबाबदारी निविदाकारावर राहिल.

६.५ जाहिरात कर, जाहिरात सेवा शुल्क, सरकारी सेवाकर व शासनाचे किंवा ठाणे महानगरपालिकेचे काही कर असल्यास तसेच यासंबंधी शासनाने नविन कर लागु केल्यास ते वेळोवेळी अदा करण्याची जबाबदारी यशस्वी निविदाकाराची राहील असे कर थकीत असल्यास सदरची रक्कम सुरक्षा अनामत रकमेतुन वळती केली जाईल. वसुलीबाबत काही न्यायालयीन व अनुषंगिक खर्च आल्यास सदरचा खर्च निविदाकारास दयावा लागेल.

**७) परिवहन सेवेच्या, महानगरपालिकेच्या, शासनाच्या जाहिरातीकरीता पॅनल उपलब्धतेबाबत.**

निविदाकाराने परिवहन सेवेच्या १०% बसेसवर सार्वजनिक हिताच्या जाहिराती किमान वर्षातुन १५ दिवसांसाठी विनामूल्य प्रदर्शित करण्याकरीता बसेस वरील जाहिरातीचे पॅनल उपलब्ध करणे बंधनकारक राहील. याबाबत निविदाकारास कोणताही मोबदला दिला जाणार नाही.

**८) अयोग्य जाहिरातीबाबत.**

८.१ परिवहन व्यवस्थापकांना जर असे दिसून आले की,कोणतीही एखादी जाहिरात प्रचलित कायद्याच्या तरतूदीचे उल्लंघन करणारी असेल किंवा एखादया धर्माबाबत अनादर दर्शविणारी असेल किंवा जनतेमध्ये प्रक्षोभ निर्माण करणारी अथवा अभिरुचीहीन असेल अशी जाहिरात प्रदर्शित करण्यास परवानगी दिली जाणार नाही.त्याचप्रमाणे द्य,तंबाखू, गुटखा, जर्दा,सिगारेट,बिडी यासारख्या मादक पदार्थाच्या जाहिराती देखील परिवहन सेवेच्या जाहिरात फलकावर प्रदर्शित करण्यास परवानगी दिली जाणार नाही.अशा जाहिरातीबाबत आक्षेप घेताच त्वरेने काढून/पुसुन टाकण्याची जबाबदारी निविदाकारावर राहील. जर निविदाकाराने निर्धारीत वेळेत जाहिरात पुसली नाही तर परिवहन सेवा अशी जाहिरात काढुन टाकेल व जाहिरात काढुन टाकण्याचा खर्च सुरक्षा अनामत रकमपोटी देऊ केलेल्या बॅक गॅरेटीच्या रकमेतुन वळती करुन घेण्यात येईल.

८.२ श्री.छत्रपती शिवाजी महाराज किंवा कोणतेही राष्ट्रीय पुढारी किंवा धार्मिक संस्थापक /राजकीय नेते व व्यक्ती यांची नांवे अथवा/प्रतिमा/चित्र दर्शविणा-या व्यापारी जाहिराती किंवा राजकिय संदेश प्रदर्शित करणा-या जाहिरातीस प्रतिबंध केला जाईल.

**९) जाहिराती काढुन टाकणे/पुसून टाकणे इत्यादी.**

९.१ जाहिराती काढुन टाकल्यानंतर किंवा पुसून टाकल्यानंतर कार्यशाळा व्यवस्थापक यांचा कामाची पुर्तता बरोबर समाधानकारक केल्याबाबतचा दाखला घेतला पाहिजे.

९.२ बसचे पाठीमागील बोर्ड काढुन झाल्यानंतर बटन स्टड्स हे निविदाकाराने काढुन टाकु नये ते जागीच ठेवावे/बसवावेत,जर स्टड् ,बोल्टस काढुन टाकल्याचे उपक्रमाचे कार्यशाळा खात्याने कळविल्यास त्याबाबत नुकसानीच्या प्रमाणात निविदाकाराकडुन दंड आकारण्यात येईल. जाहिरात बोर्ड काढल्यानंतर ते योग्य जागी ठेवले पाहिजे.

९.३ निविदाकाराची कराराची मुदत ज्यावेळी संपुष्टात येईल किंवा करारास ज्यावेळी स्थगिती असेल अशावेळी कंत्राटदाराने त्याप्रमाणे ४ दिवस अगादेर परिवहन व्यवस्थापकांना किंवा संबंधित नेमलेल्या अधिका-यास आगाऊ सुचना दयावयास हवी.

९.४ निविदाकाराची कराराची मुदत संपल्यानंतर निविदाकाराने जाहिराती १५ दिवसाचे आंत काढुन पुसून टाकावयाच्या आहेत व तसे न केल्यास सदर जाहिरातीचे फलक परिवहन सेवा काढुन जप्त करेल. त्यावर निविदाकाराचा काहीही अधिकारी राहणार नाही व तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

९.५ परिवहन सेवेच्या बसेस आर.टी.ओ.पासिंग,अपघात,दुरुस्ती व अन्य कारणांमुळे मार्गावर चालविण्यास काही कालावधीसाठी उपलब्ध न झाल्यास त्या कालावधीकरीता कोणत्याही स्वरुपाचा परतावा मिळणार नाही. तसेच अपघात व अन्य तत्सम कारणान्वये तसेच बस धुलाई केल्यामुळे रंगकाम पुसले गेल्यास ते पुनश्चः करण्याची जबाबदारी निविदाकारावर राहील. त्याबाबत कोणतीही भरपाई देण्यास परिवहन सेवा बांधील राहणार नाही.याबाबत निविदाकाराने नोंद घ्यावी.

**१०) युद्वजन्य परिस्थिती, दंगेधोपे, नागरी चळवळी इत्यादी काळात जाहिरात प्रदर्शित न केल्यास त्याबाबतच्या दाव्याबाबत.**

युद्वजन्य परिस्थितीत जेणेकरुन भारताच्या सार्वभौमतेस धोका निर्माण होईल व बाधा येईल,तसेच दंगेधोपे,नागरी चळवळी किंवा इतर कोणत्याही आणीबाणीचे प्रंसगी जाहिरात प्रदर्शित न करणेबाबत शासनाने निर्बंध आणल्यास जाहिराती प्रदर्शित न झाल्यास निविदाकारास भाडयाची परतफेड केली जाणार नाही.तसेच निविदाकारास कोणतीही नुकसान भरपाई देण्यास परिवहन सेवा बांधील राहणार नाही.

**११) नुकसान भरपाई/दावा इत्यादी मागणीची भरपाई करणेबाबत.**

११.१ जाहिरात प्रदर्शित करण्याबाबतीत तृतीय पक्षाकडुन कोणत्याही प्रकारचा दावा,कारवाई व नुकसान इत्यादीची भरपाई करण्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाकाराची असुन,तसे हमीपत्र निविदाकाराने परिवहन सेवेस कराराच्या वेळी देणे आवश्यक आहे. परिवहन सेवा त्यास कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

११.२ वरील कारणास्तव परिवहन सेवा,ठाणे महानगरपालिकेस कोणत्याही स्वरुपाचा न्यायालयीन खर्च आल्यास किंवा नुकसान भरपाई दयावी लागल्यास ती संपुर्णतः देण्याची जबाबदारी यशस्वी निविदाकाराची राहील.

११.३ आलेला न्यायालयीन खर्च अथवा नुकसान भरपाई यशस्वी निविदाकाराने परिवहन सेवेने न दिल्यास ती सुरक्षा अनामत रकमेतुन वसुल करण्यात येईल.

**१२) निविदाकाराच्या कामगारास आगारात प्रवेश करु देणेबाबत.**

१२.१ निविदाकारास ज्यांना उपरोक्त कामासाठी प्रवेश द्यावयाचा असेल त्यांना प्रवेशिका देण्यात येईल. प्रवेशिकेवर लावण्यासाठी वरील इसमाचे दोन फोटो (पासपोट साईज) उपक्रमास द्यावे लागतील.

१२.२ कोणाही व्यक्तींना उपक्रमाच्या आवारात प्रवेश देणे/अथवा न देणे हे उपक्रमाच्या अधीन असुन त्याचे हक्क उपक्रमाकडे असतील.

१२.३ निविदाकाराने स्वतःच्या संस्थेच्या नांवाचे कर्मचा-यांना ओळखपत्र देणे बंधनकारक राहील व ते कर्मचा-याने स्वतःजवळ बाळगले पाहिजे .ओळखपत्राशिवाय उपक्रमामध्ये प्रवेश दिला जाणार नाही. सदर ओळखपत्रावर परिवहन सेवेच्या नावाच्या लोगोचा उल्लेख करु नये. सदर ओळखपत्रावर परिवहन सेवेच्या बसेसमधुन मोफत प्रवासाची सवलत मळणार नाही.तसे केल्याचे निदर्शनांस आल्यास त्यांचे ओळखपत्र रद्द करण्यात येईल.

**१३) करारनामा करणेबाबत.**

करारनाम्यासाठी लागणारी स्टॅम्पडयुटी प्रशासकीय खर्च इत्यादी रक्कम रुपये २०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये विस हजार मात्र) हा संबंधित यशस्वी निविदाकारास

करावा लागेल किंवा त्यापेक्षा जास्त खर्च आल्यास तो संबंधित यशस्वी निविदाकारास करावा लागेल.

**१४) ज्या निविदाकारास कार्यादेश देण्यात आला त्यास सदरचे काम अन्य व्यक्तीस/एंजन्सी/पूर्णपणे अथवा अंशतः विभागुन देण्याचा अधिकार राहणार नाही.**

ज्या निविदाकारास कार्यादेश देण्यात आला आहे त्याच निविदाकारास या निविदेची पूर्तता करणेचे बंधनकारक राहील.सदर हक्काबाबत संबंधित निविदाकारास अखत्यार दिल्यानंतर दुस-या कंत्राटदारास किंवा अन्य व्यक्तीस/कंपनीस हस्तांतरीत बदली करता येणार नाही.तसे केल्याचे आढळुन आल्यास सदर कामाचा ठेका कोणतीही पूर्व सुचना न देता रद्द करण्यात येऊन सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. करार संपुष्टात आल्यानंतर निविदाकाराने सुरक्षा अनामत पोटी दिलेली बॅक गॅरेंटी जप्त करण्यात येईल.

**१५)** परिवहन सेवेस जाहिरात प्रदर्शित करण्यापोटी देऊ केलेल्या देकाराच्या रकमेवर नियमानुसार वेळोवेळी शासनास अदा करावयाची सेवाकराची रक्कम निविदाकाराने परिवहन सेवेस विहीत वेळेत देणे बंधनकारक राहील व ही रक्कम देऊ केलेल्या भाडया व्यतिरिक्त असेल.

**१६)** कराराबाबत काही वाद निर्माण झाल्यास लवाद म्हणून निर्णय घेण्याचे अथवा लवाद नेमण्याचे अधिकार मा.परिवहन व्यवस्थापक यांना असतील व त्याचा निर्णय दोन्हीही पक्षांवर बंधनकारक राहील.

**१७)** कराराच्या कालावधीमध्ये कराराबाबत काही वादविवाद निर्माण झाल्यास करावयाच्या दाव्याबाबतचे न्यायालयीन कामकाज ठाणे न्यायाधिकरणाच्या कक्षेतच राहील.

**१८)** कराराचे कालावधीमध्ये कराराचे अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास आल्यास करार रद्द करण्याचे अधिकार परिवहन व्यवस्थापक यांना विहित असतील.

उपरोक्त अटी/शर्तीमध्ये वाढ करणे, बदल करणे, फेरफार करणे याबाबतचे अधिकार परिवहन व्यवस्थापक यांना विहित असतील .

# परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका, ठाणे

## परिशिष्ट "अ "

परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका उपक्रमाच्या बस ताफयात JNNURM अंतर्गत येणा-या २०० बसेसवर जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी उपलब्ध असलेल्या जागांचा तपशिल.

| अ. क्र. | बसचा प्रकार | बस दांख्या | जागाचा तपशिल. | आकारमान मि.मि. | प्रति बस एकुण जागा. |
|---|---|---|---|---|---|
| १ | एल.पी.ओ. १५१२ डिझेल. | ८० | १.उजव्या बाजुचे पॅनल.<br>२.१डाव्या बाजुचे पॅनल.<br>२.२डाव्या बाजुचे पॅनल.<br>३.मागील बाजुचे पॅनल.<br>४. प्रवासी सिटच्या पाठीमागील बाजु.<br>५.आतील छोटे पॅनल.<br>६. ग्रॅब हन्डल. | ८२०० X ४००<br>२२४० X ४००<br>३१२० X ४००<br>२४०० X ५००<br>२४५ X ३००<br>८०० X ३८० | ०१<br>०१<br>०१<br>०१<br>३७<br>०९ |
| २ | एल.पी.ओ. १६१३ सी.एन.जी. | ८० | १.उजव्या बाजुचे पॅनल.<br>२डाव्या बाजुचे पॅनल.<br>३.मागील बाजुचे पॅनल.<br>४. प्रवासी सिटच्या पाठीमागील बाजु.<br>५.आतील छोटे पॅनल.<br>६. ग्रॅब हन्डल. | ७५०० X ४००<br>५००० X ४००<br>२१४० X ५००<br>२४५ X ३००<br>८०० X ३८० | ०१<br>०१<br>०१<br>३९<br>०६ |
| ३ | एल.पी.ओ. १६१८ डिझेल. | ३० | | वरीलप्रमाणे. | |
| ४ | एल.पी.ओ. १६१८ डिझेल. | १० | | वरीलप्रमाणे. | |

**<u>परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका, ठाणे</u>**

**<u>परिशिष्ट "ब "</u>**

**<u>लखोटा क्रमांक १</u>**

प्रति,
मा.परिवहन व्यवस्थापक,
परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका,
मुख्य प्रशासकिय भवन, रोड २७ व ३४,
वागळे आगार, वागळे इस्टेट,
ठाणे ४०० ६०४

**विषय :-** परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका उपक्रमाच्या बस ताफयात JNNURM येणा-या २०० बसेसवर तीन वर्षाच्या कालावधीसाठी जाहिरात प्रदर्षित करण्याचे सर्व हक्क घेणेबाबतची निविदा.

**संदर्भ** :-जा.क्र.ठामपा/पसे/पव्य/निविदासुचना/५४८/०९दि.२४ /१२/२००९

---

महोदय,

परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका उपक्रमाच्या बस ताफयात JNNURM येणा-या २०० बसेसवर तीन वर्षाच्या कालावधीसाठी जाहिरात प्रदर्शित करण्याबाबतचे हक्क निविदे सोबत दिलेल्या अटी व नियम कराराच्या शर्तीच्या अधिन राहुन आम्ही सोबत जोडलेल्या तक्त्यामधील नमुद केलेल्या दराने घेण्यास तयार आहोत.

१. इसा-याची रक्कम रुपये ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लक्ष मात्र) पावती क्रमांक ...........दिनांक / /२००९ रोजी परिवहन सेवेच्या लेखाशाखेत भरली आहे. पृष्ठ क्रमांक ................

२.१ इतरत्र करीत असलेल्या जाहिरात प्रदर्शित करण्याबाबतच्या यापूर्वीच्या लगतच्या ३(तीन) वर्षाच्या अनुभवाच्या दाखल्यासह तपशील.पृष्ठ --- ते ----

२.२ निविदाकार इतर उद्योगधंदा करीत असल्यास त्याबाबतचा पूर्ण तपशील. पृष्ठ --- ते ---

२.३ भागीदारी संस्था असल्यास भागीदारांचे नांव,पत्ता व करारप्रत व संस्था नोंदणी पत्राची प्रत. पृष्ठ --- ते ----

२.४ निविदाकाराची लगतच्या ३(तीन) वर्षाची प्रत्येक वर्षाची वार्षिक उलाढाल रक्कम रुपये २ कोटी (रुपये दोन कोटी मात्र) असल्याबाबत लगतच्या मागील ३ वर्षाचा सनदी लेखाकाराने प्रमाणित केलेला वार्षिक ताळेबंद व नफा तोटा पत्रक. पृष्ठ --- ते

२.५ मागील तीन वर्षाचा इन्कमटॅक्स क्लिअरन्सचा दाखला. पृष्ठ --- ते ----

२.६ इतर शेरा निविदाकार नमुद करु इच्छित असेल तर तो स्वतंत्र पत्रात टंकलिखित करुन आपल्या सहीनिशी जोडावा. सदर पत्रासोबत कागदपत्रे जोडल्यास त्यावर निविदाकाराने पूर्ण सही करुन जोडावीत. पृष्ठ --- ते ----

२.७ या व्यतिरिक्त जाहिरात प्रदर्शित करण्यापोटी आवश्यक असलेले सरकारी सेवाकर भरणा करण्यासाठी सेवाकर नोंदणीय प्रमाणपत्राची प्रत. पृष्ठ --- ते ----

२.८ साक्षांकीत केलेले मुळ निविदा प्रपत्र. पृष्ठ --- ते ----

निविदाकराची स्वाक्षरी --------------------------------
पुर्ण नांव व पत्ता --------------------------------
--------------------------------
--------------------------------
संस्थेचे नांव व हुद्दा --------------------------------
पुर्ण पत्ता --------------------------------
संपर्क दूरध्वनी क्रमांक --------------------------------
संस्थेचा रबरी शिक्का सिल.

**<u>साक्षीदार :</u>**

१) सही ................................
नांव ................................
पत्ता ................................
संपर्क दुरध्वनी क्रमांक

२) सही ................................
नांव ................................
पत्ता ................................
संपर्क दुरध्वनी क्रमांक

## परिवहन सेवा,ठाणे महानगरपालिका,ठाणे

## (देकार दर्शविणारा लखोटा)

## परिशिष्ट "क"

**विषय :-** परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका उपक्रमाच्या बस ताफयात JNNURM अंतर्गत येणा-या २०० बसेसवर जाहिरात प्रदर्शित करण्यासाठीतीन वर्षाच्या कालावधीसाठी सर्व हक्क घेणेबाबतची निविदा.

**संदर्भ** :-जा.क्र.ठामपा/पसे/पव्य/निविदासुचना/५४८/०९दि.२४ /१२/२००९

---

उपरोक्त कामाकरीता निविदा दस्तऐवजातील अटी व शर्ती आंम्ही वाचल्या असून त्या आम्हांस मान्य आहेत. या कामासाठी आम्ही खालील प्रमाणे देकार देत आहोत.

| अ.क्र | वर्ष. | दर प्रति बस प्रति वर्षाकरीता. | एकुण रक्कम (एकुण बसेस x दर प्रतिवर्ष प्रतिबस) रक्कम रुपये . |
|---|---|---|---|
| १ | पहिले. | रुपये -<br>(अक्षरी रुपये --------------------<br>-------------------------------) | रुपये -<br>(अक्षरी रुपये --------------------<br>-------------------------------) |
| २ | दुसरे. | रुपये -<br>(अक्षरी रुपये --------------------<br>-------------------------------) | रुपये -<br>(अक्षरी रुपये --------------------<br>-------------------------------) |
| ३ | तिसरे. | रुपये -<br>(अक्षरी रुपये --------------------<br>-------------------------------) | रुपये -<br>(अक्षरी रुपये --------------------<br>-------------------------------) |
| एकुण देकार रुपये | | | रुपये - |

एकुण देकार अक्षरी रक्कम रुपये ---------------------------------------------

आंम्ही देकारात तीन वर्ष कालावधीसाठी परिवहन सेवेस देऊ केलेल्या देकाराच्या रकमेची सरासरी काढुन जे दर येतील त्यानुसार प्रतिबस प्रति महिना भाडे आकारुन ६ महिन्याचे आगाऊ भाडे देण्यांस तयार आहोत.

निविदाकराची स्वाक्षरी --------------------------------
पुर्ण नांव व पत्ता --------------------------------
--------------------------------
--------------------------------
संस्थेचे नांव व हुद्दा --------------------------------
पुर्ण पत्ता --------------------------------
संपर्क दूरध्वनी क्रमांक --------------------------------
संस्थेचा रबरी शिक्का सिल.

**<u>साक्षीदार :</u>**

१) सही .................................
नांव .................................
पत्ता .................................
संपर्क दुरध्वनी क्रमांक

२) सही .................................
नांव .................................
पत्ता .................................
संपर्क दुरध्वनी क्रमांक .